सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५६२

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०६/२०२३ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.५१८ ते ठराव क्र.५६१ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते. D.P. Suryavanshi महापौर,

महासभा विभाग

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/०७/२०२३

महासभा क्रमांक :- ०४

ठराव क्रमांक :- ५६३

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथील एका वसाहतीवर दरड कोसळून रात्रीच्या झोपेतच अनेक जणांवर काळाने घाला घातला, या दरड दुर्घटनेत १२० हून अधिक जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भिती आहे. या दुर्घटनेनंतर रेस्क्यु ऑपरेशन मध्ये आतापर्यत पाच ते सहा मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. तर २७ जणांची सुटका करण्यात आली आहे या दु:खद दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कुटूंबावर व नातेवाईकांवर दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी

अनुमोदक :- श्री.अजिंक्य दिनकर पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५६४

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर यांच्या पत्नी ज्येष्ठ गणिततज्ञ, शास्त्रज्ञ आणि लेखिका डॉ.मंगला नारळीकर यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी कर्करोगाने दु:खद निधन झाले. तसेच जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नारायणराव कदम यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- सौ.भारती हेमंत दिगडे

अनुमोदक :- सौ.अनारकली जमीर कुरणे

ठराव सर्वानुमते मंजुर

Dfsurjarish'
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५६५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

आमचे मार्गदर्शक, महाराष्ट्राचे आश्वासक नेतृत्व व महाराष्ट्राच्या राजकारणात धाडसी निर्णायक क्षमता असलेले मा.ना.श्री.अजितदादा पवार यांची महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री पदी,मा.ना.हसनसो मुश्रीफ यांची वैद्यकिय शिक्षण मंत्री पदी, मा.ना.छगन भुजबळ यांची नागरी अन्न व पुरवठा मंत्री पदी व मा.खा सुनिलजी तटकरे यांची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेशाध्यक्ष पदी निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.अतहर इद्रिस नायकवडी

अनुमोदक :- श्री.योगेंद्र भगवान थोरात

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

पदाधिकारी सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५६६

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक,स्थायी समिती समिती सदस्य श्री.प्रकाश बाबासो ढंग यांची भारतीय जनता पार्टीच्या सांगली शहर जिल्हाध्यक्ष पदी तसेच इस्लामपुरचे लोकनियुक्त नगराध्यक्ष मा.निशिकांत दादा पाटील यांची भारतीय जनता पार्टीच्या सांगली ग्रामिण जिल्हाध्यक्षपदी निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी

अनुमोदक :- श्री.अजिंक्य दिनकर पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५६७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या त्रिकोणी बाग येथील मध्यवर्ती निदान केंद्रामध्ये गेल्या दीड वर्षात १ लाख तपासण्या झाल्या व रुग्णांचे तब्बल रु.२ कोटी रुपयांची बचत झाली आहे. याबद्दल महानगरपालिका आयुक्तसो श्री.सुनिल पवार व केंद्र प्रमुख श्री.रघुवीर हलवाई यांचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.जगन्नाथ बापू ठोकळे

अनुमोदक :- श्री.युवराज सतिश बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५६८

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे ब्रँड ॲम्बेसेडर आणि सांगलीचे स्वच्छतादुत शोले स्टाईल सामाजिक कार्यकर्ते श्री.दिपक भिमराव चव्हाण यांची दिल्लीत आयोजित आंतरराष्ट्रीय कलाम युथ लीडर शिप कॉन्फरन्ससाठी आणि युथ पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून निवड झाली आहे. त्यांना दि.२७ जुलै रोजी नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय युथ ॲवॉर्ड देवून सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल व पुरस्कार प्राप्त झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

अनुमोदक :- श्री.गजानन रामू मगदूम

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५६९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

श्रीहरिकोटा येथील अंतराळ केंद्रावरुन दि.१४ जुलै २०२३ रोजी चंद्रयान-३ चंद्राच्या दिशेनं यशस्वीपणे झेपावलं. विशेष म्हणजे या रॉकेटच्या पार्टस् च महत्वपूर्ण कोटिंगचं काम सांगलीतील उद्योजक श्री.संदिप सोले यांच्या डॅझल डायनाकोटस् प्रा.लि.या फॅक्टरीत पार पडलं ही बाब महाराष्ट्राची मान उंचावणारी आहे. त्यांच्या या कार्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.भारती हेमंत दिगडे

अनुमोदक :- सौ.अनारकली जमीर कुरणे

ठराव सर्वानुमते मंजुर

D/Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५७०

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

राज्य शासनाकडून दिला जाणारा शिव छत्रपती क्रिडा पुरस्कार सांगली जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय वेटलिफ्टर संकेत सरगर,सायकलपटू प्रियांका कारंडे,तिरंदाज मयुर रोकडे व ॲथलेटिक्स पारस पाटील यांना जाहिर झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

अनुमोदक :- श्री.गजानन रामू मगदूम

ठराव सर्वानुमते मंजुर

D. Suryavanshi

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५७१

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्रिडा क्षेत्रातील शिवप्रेमी खो-खो क्लब,कुपवाड ची राज्य राष्ट्रीय खेळाडू भैरवनाथ स्पोर्टस,बामनोली ची राष्ट्रीय सायकल पटू खेळाडू कु.प्रियांका शिवाजी कारंडे हीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या पीएसआय मुख्य परिक्षेत यश संपादन करुन पीएसआय या पदावर निवड झाली तसेच महाराष्ट्र शासनातर्फे दिला जाणारा शिवछत्रपती क्रिडा पुरस्कार कु.प्रियांका शिवाजी कारंडे यांना मिळालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :-श्री.गजानन रामू मगदूम

अनुमोदक :- श्री.विनायक रमेश सिंहासने

ठराव सर्वानुमते मंजुर

D/ Suryavansh
महापौर,

महानगरपालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५७२

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे सहा.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०७/०७/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१८ मधील शामराव नगर परिसरातील इनामधामणी लगत परिसरामध्ये नागरिकांना त्यांचे दैनंदिन व्यवहार करणेस अडचणी येत आहेत त्यामुळे सदर परिसराचे तिर्थकर कॉलनी असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेखजी मोहिते

महापौर,

सहाय्यक आयुक्त

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५७३

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे सहा.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१८/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील (१)सि.स.नं.४७८२ माधवनगर रोड,सांगली (२)सि.स.नं.२६९ फायर स्टेशन जवळ (३)सि.स.नं.२३३ पाटीदार भवन,सांगली (४)स.नं.३३४ ऑक्सिडेशन पौंड हनुमान नगर,सांगली (५)स.नं.४/२अ/१अ/५/१/२ विजयनगर घरपट्टी ऑफिस (६)स.नं.२५/२अ विजयनगर घरपट्टी ऑफिस इत्यादी जागेमधील ५.०० मीटर X६ मीटर मापाची जागा भारत गॅस रिसोर्सेस लिमिटेड मॅनेजर सांगली,सातारा यांना २९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस मान्यता देणेकामी सादर केलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रशासनाने सुधारीत प्रस्ताव सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री.मेनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते

D.P.Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५७४

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१३/०६/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्वच्छ भारत मिशन-२ अंतर्गत आकांक्षी स्वच्छतागृहे मनपा मालकीच्या जागेवर उभारणी करणेस परिच्छेद क्र.५.२.७.२ मध्ये आकांक्षी स्वच्छता गृहाकरिता र.रु.२,५०,०००/- प्रति शिट प्रमाणे मा.शासनाकडून निधी आणणे आहे त्यानुसार प्रशासनाने खालील प्रमाणे आकांक्षी स्वच्छता गृहासाठी तीन जागा निश्चित केलेल्या आहेत. यामध्ये (१) वॉर्ड क्र.१७ मधील स.नं.३६९/४ (२) वॉर्ड क्र.१४ मध्ये स.नं.९८१ व (३) वॉर्ड क्र.१० मधील स.नं.२९० या ठिकाणी आकांक्षी स्वच्छतागृह उभारणेस शिफारस केलेली आहे. त्यास ही सभा सहमती दर्शवित असून, सदरच्या २० सिट आकांक्षी स्वच्छतागृहासाठी केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा ३५ लक्ष व मनपाचा हिस्सा १५ लक्ष असा असून, उपरोक्त तिन्ही जागेवर सहा सिटचे आकांक्षी शौचालय उभारणेस व त्याकामी येणारे अंदाजे र.रु.५० लाख मात्रच्या खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड वॉर्ड क्र.८ क मधील विजयनगर येथील भाग वर्दळीचा असून, या ठिकाणी आठवडी बाजार भरत आहे. या ठिकाणी न्यायालय व जिल्हाधिकारी कार्यालय असून, सदर परिसरामध्ये महिलांसाठी स्वच्छता गृह नसल्याने, महिलांची गैरसोय होत असल्याने मा.शासनाच्या आकांक्षी शौचालय योजनेमधून विजयनगर रेल्व पुलालगत असणाऱ्या १०० फुटी डी.पी.रोड लगत अथवा त्यालगत असलेल्या स.नं.१० मध्ये मनपा मालकीच्या खुल्या जागेत महिलांसाठी १ युनिट व उल्हासनगर,कुपवाड महावीर व्यायाम शाळा ओपन स्पेस मधील जागेत महिलांसाठी १ युनिट आकांक्षी शौचालय बांधणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.विष्णू माने ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.मैनुद्दीन बागवान D.C. Suryavanshi महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५७५

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१८/०१/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड सिटी पार्क या प्रयोजनाकरीता स.नं.१५१ (नवा १०३) या जमिनीमधील आ.क्र.१७८ करिता संपादित करावयाचे क्षेत्राचे अंतिम निवाड्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ चे पोटकलम ४ सह भूमीसंपादन अधिनियम, भूमीसंपादन,पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकता हक्क अधिनियम २०१३ अन्वये करावयाच्या भूसंपादनसाठी मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत भूसंपादन अंतिम निवाडा क्र.उजि/भूसंपादन/०३/आरआर-एसआर-०१/२०२२ दि.२९/१२/२०२२ रोजी अंतिम निवाडा झाला असून, सदर निवाड्यानुसार र.रु.६,७३,९८,३५४/- इतकी परिगणीत करणेत आलेली असून, यापुर्वी ३०% र.रु.१,३४,५७,७६०/- मात्रचा धनादेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जमा करणेत आलेला आहे व उर्वरित र.रु.५,३९,४०,५९४/- मात्र जिल्हाधिकारी कार्यालय, भूसंपादन शाखेस जमा करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.५०२ दि.०३/०३/२०२३ अन्वये मान्यता देणेत आलेली असून, उपरोक्त प्रमाणे भूसंपादनसाठी करणेत आलेल्या कार्यवाहीस ही सभा कार्योत्तर मान्यता देत आहे.

सूचक :- सौ. भारती दिगडे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. धीरज सुर्यवंशी

D. P. Suryavanshi
महापौर,

उ.स.न.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५७६

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/०४/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

भारत सरकार अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांच्या वतीने प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (पी.एम.जे.व्ही.के.) अंतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील मा.महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभाग मुंबई यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावातील सांगली येथील गारपीर दर्गा समोरील महानगरपालिकेची जुनी शाळा क्र.२० स.नं.४४२/२ पैकी, ४४२/१/८, ४४२/१/९ येथील उर्दु शाळा व ई-लाईब्ररीची इमारत बांधणे व परिसर विकसीत करणे र.रु.२,७६,००,०००/- हा प्रस्ताव रद्द करणेसाठी प्रशासनाने सादर केलेला आहे.

सबब, भारत सरकार अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय यांच्या वतीने प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (पी.एम.जे.व्ही.के.) अंतर्गत सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेस मा.महाराष्ट्र शासन अल्पसंख्यांक विभाग मुंबई मा.शासनाकडून सदरचा निधी मंजूर झालेला असलेने, सदरचा निधी शासनास परत जावू नये यासाठी प्राप्त निधीतनू एम.बी.एज्युकेशन सोसायटीला भाडे तत्वावर दिलेली जागा सोडून, सदर [redacted]. स.नं.४४२/२ मध्ये महापालिकेच्या शाळा नं.२० जवळील महापालिकेच्या खुल्या भूखंडावर ई-लाईब्ररी इमारत बांधणे व परिसर विकसीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. रोडजी मोहिते D. P. Surjavashi महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५७७

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.१०/०७/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना महापालिका पाणी पुरवठा विभागाकडून पाणी पुरवठा केला जातो. त्यांची पाणीपट्टी बिले नागरिकांना नियमितपणे वितरीत केली जातात. माहे मार्च २०२३ अखेर महापालिकेच्या पाणीपट्टी बिलाची रक्कम ४२,२८,५२,६८७/- व व्याज व विलंब शुल्क र.रु.१९,६२,३१,८९९/- अशी एकूण रु.६१,९०,८४,५८६/- इतक्या मोठ्या प्रमाणात थकबाकी वाढ झालेली आहे. सदर थकबाकीमध्ये ग्रामपंचायत,रेल्वे, झोपडपट्टीधारक व थकबाकी न भरलेने बंद केलेल्या कनेक्शनधारकचा समावेश आहे. महापालिकेने यापुर्वी २००३-०४ ते २०१२-१३ या कालावधी मध्ये दरवर्षी विलंब शुल्क माफी मा.महापौर योजना राबविली होती. त्यामध्ये पाणीपट्टी ग्राहकांनी एकरक्कमी थकबाकी भरल्यास त्यास व्याज / विलंब शुल्क १००% सवलत देणेत आलेली होती. परंतु सदर योजनेस महापालिकेने मा.राज्य शासनाची मंजुरी न घेतल्यामुळे लेखापरिक्षणामध्ये आक्षेप नोंदविणेत आलेले होते. त्यामुळे सदरची योजना बंद करणेत आलेली होती.

सन २०१९ मध्ये महापालिका क्षेत्रात श्री.कृष्णा नदीला आलेला महापुर तसेच कोविड-१९ मुळे २०२० व २०२१ या कालावधी मध्ये नागरिकांचेकडून आर्थिक अडचणीमुळे पाणीपट्टीची बिले न भरल्यामुळे त्यावर व्याज/विलंब शुल्क वाढून थकबाकी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे व थकबाकी वसुल न झाल्यामुळे महापालिकेची आर्थिक बाजू कमकुवत झालेली आहे.

उपरोक्त सर्व वस्तुस्थिती पाहता महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे थकीत पाणीपट्टी वसुली होणेसाठी ग्राहकांना त्यांचे थकबाकीवरील व्याज/विलंब शुल्कामध्ये १००% माफी दिल्यास महापालिकेची पाणीपट्टी थकबाकी मोठ्या प्रामणात वसुल होईल असे या सभेचे मत असून, महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दि.१९ जून २०१० च्या शासन निर्णयानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारात मा.महासभेच्या मान्यतेने मा.शासनाची मान्यता घेवून जे थकबाकीदार एक रक्कमी थकबाकी भरतील त्यांना व्याज / विलंब आकारामध्ये १००% माफी देता येईल त्यानुसार थकबाकीधारक ग्राहकांना एकरक्कमी भरणा केल्यास व्याज / विलंब शुल्कामध्ये १००% माफी देण्यास मान्यतेसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ. भारती दिगडे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेखर इनामदार

महापौर,

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- २०/०७/२०२३

ठराव क्रमांक :- ५७८

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.११/०७/२०२३ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली वॉर्ड क्र.१० मधील अच्युतराव कुलकर्णी प्लॉट जवळील सार्वजनिक शौयालय पाडणेबाबत सादर केलेल्या अहवालनुसार सदर शौचालयाचा वापर तीन कुटूंबासाठी खुले ठेवणे उचित होणार नसलेने, सदरचे शौचालय पाडणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.मंगेश मारुती चव्हाण यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.१५ मधील क्रांती क्लिनीक,सांगली येथील सार्वजनिक मुतारी जुनी व जीर्ण होवून पुर्णत: मोडकळीस आलेली आहे. सदर ठिकाण हे रहदारीच्या व गर्दीच्या ठिकाणीचे असून, परिसरातील नागरिकांच्या जिवितास धोकादायक असलेने, नागरिकांची सदरची मुतारी पाडणेसाठी वारंवार मागणी होत असल्याने, सदरची मुतारी पाडणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.गजानन रामू मगदुम यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड येथील विजयनगर रोड श्री हॉस्पिटल समोरील सार्व.शौचालय हे कुपवाड ग्रामपंचायत अस्तित्वात असताना नागरिकांचे सोयीसाठी बांधणेत आलेले आहे. सदर ठिकाण हे रहदारीच्या व गर्दीच्या ठिकाणीचे असून, परिसरातील नागरिकांच्या जिवितास धोकादायक असलेने, नागरिकांची सदरचे शौचालय पाडणेसाठी वारंवार मागणी होत असल्याने, सदर ठिकाणची शाखा अभियंता यांनी पहाणी करुन, सादर केले अहवालनुसार सदरचे शौचालय पाडणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेहबुबहीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शेडजी मोहिते. महापौर,